-: महाराष्ट्र शासन :-

गृह विभाग

**न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

विद्यानगरी, कालीना, हंसभुग्रा मार्ग, सांताक्रुज (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

---

**जाहिरात क्रमांक १, सन-२०२४**

गट-क या संवर्गातील पदांची सरळसेवा भरतीसाठी जाहिरात.

शासन निर्णय, गृह विभाग क्र.एफएसएल-०४१९/प्र.क्र.५००/पोल-४, दि.२८.९.२०२१ आणि सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.०४.०५.२०२२ तसेच गृह विभाग, शासन निर्णय क्र.एफएसएल-०४२२/प्र.क्र.२०२/पोल-४, दि.१२.०९.२०२२ व वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/आ.पु.क., दि.३१.१०.२०२२ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१२/प्र.क्र.१३६/का.१३-अ, दि.२१.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मधील दिलेल्या निर्देशानुसार न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील मुंबई, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अमरावती, नांदेड, कोल्हापूर, चंद्रपूर, रत्नागिरी, धुळे, ठाणे व सोलापूर प्रयोगशाळेतील **गट क संवर्गातील** सरळसेवेतील खालील रिक्त पदांसाठी **ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | वैज्ञानिक सहायक (गट क)<br>Scientific Assistant | एस-१३ (३५४००-११२४००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | ५४ |
| २ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण), (गट क)<br>Scientific Assistant (Cyber Crime, Tape Authentication & Speaker Identification) | एस-१३ (३५४००-११२४००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र) (गट क) Scientific Assistant (Psychology) | एस-१३ (३५४००-११२४००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | २ |
| ४ | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक (गट क) Senior Laboratory Assistant | एस-८ (२५५००-८११००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | ३० |
| ५ | वरिष्ठ लिपिक (भांडार) (गट क) Senior Clerk (Stores) | एस-८ (२५५००-८११००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | ५ |
| ६ | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक, (गट क) Junior Laboratory Assistant | एस-७ (२१७००-६९१००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | १८ |
| ७ | व्यवस्थापक (उपहारगृह) (गट क) Manager (Canteen) | एस-10 (29200-92300) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | १ |

ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सूचना न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी. या पदांसाठी खालील अटी व अर्हतेची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

वर नमूद केलेल्या पदांचा अनुशेष, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन भरावयाच्या पदांचा तपशील, त्यांची वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

२. **उपलब्ध पदसंख्या:-**

| अ. क्र. | पदनाम, गट व वेतनसंरचना | एकूण पद संख्या | आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय पदे | आवश्यक शैक्षणिक अर्हता | आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैज्ञानिक सहायक (गट क)<br>Scientific Assistant<br><br>एस-१३ (३५४००-११२४००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | ५४ | ५४ | विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र विषयासह मान्यता प्राप्त विद्यापीठाची कमीत कमी दुस-या वर्गात पदवी उत्तीर्ण.<br>**किंवा**<br>न्यायसहायक विज्ञान विषयासह विज्ञान शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची कमीत कमी दुस-या वर्गात पदवी उत्तीर्ण. | --- |

| एकूण रिक्त पदसंख्या | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | ६ | २ | २ | २ | २ | २ | २ | ११ | ५ | २० | ५४ |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | ३ | १ | ७ | १९ |
| महिला आरक्षण ३०% | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | ३ | २ | ६ | १९ |
| माजी सैनिक १५% | १ | - | - | - | - | - | - | २ | १ | ३ | ७ |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | १ | - | - | - | - | - | - | १ | १ | २ | ५ |
| प्रकल्पग्रस्त ५% | - | - | - | - | - | - | - | १ | - | १ | २ |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | - | १ | - | १ | २ |
| भूकंपग्रस्त २% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | ६ | २ | २ | २ | २ | २ | २ | ११ | ५ | २० | ५४ |
| अनाथ | १ पद | | | | | | | | | | |
| दिव्यांग | २ पदे :- a) १ पद- कर्णबधीर अथवा ऐकु येण्यातील दूर्बलता (Deaf/Hearing Impaired/HH)<br>b) १ पद- SLD, MI. | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण), (गट क)<br>Scientific Assistant (Cyber Crime, Tape Authentication & Speaker Identification)<br><br>एस-१३ (३५४००-११२४००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | १५ | १५ | विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र किंवा संगणक शास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती आणि तंत्रज्ञान या विषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी अथवा अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती आणि तंत्रज्ञान किंवा न्यायसहायक विज्ञान या विषयातील किमान व्दितीय श्रेणीतील पदवी उत्तीर्ण.<br>**किंवा**<br>Post Graduate Diploma in Digital and Cyber Forensic and Related Law | --- |

| एकूण रिक्त पदसंख्या | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | २ | २ | - | - | - | - | १ | २ | २ | ६ | १५ |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १ | - | - | - | - | १ | १ | १ | २ | ७ |
| महिला आरक्षण ३०% | १ | १ | - | - | - | - | - | १ | १ | २ | ६ |
| माजी सैनिक १५% | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त २% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | २ | २ | - | - | - | - | १ | २ | २ | ६ | १५ |
| दिव्यांग | १ पद :- कर्णबधीर अथवा ऐकु येण्यातील दूर्बलता (Deaf/Hearing Impaired/HH) | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र), (गट क)<br>Scientific Assistant (Psychology)<br><br>एस-१३ (३५४००-११२४००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | २ | २ | मानसशास्त्र विषयातील किमान व्दितीय श्रेणीतील पदवी किंवा शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अन्य अर्हता. | --- |

| **एकूण रिक्त पदसंख्या** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | आर्थिक दुर्बल घटक | **अराखीव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ | २ |

| **समांतर आरक्षण** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | आर्थिक दुर्बल घटक | **अराखीव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ | २ |
| महिला आरक्षण ३०% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक १५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त २% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ | २ |

* ज्यांनी एक वर्ष मानसशास्त्रीय अभ्यासातील प्रशिक्षण आणि किंवा संशोधन व विकासाचा अनुभव धारण केला आहे, अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक (गट क)<br>Senior Laboratory Assistant<br><br>एस-८ (२५५००-८११००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | ३० | ३० | विज्ञान शाखेत उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (HSC Science) परिक्षा उत्तीर्ण. | --- |

| **एकूण रिक्त पदसंख्या** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | आर्थिक दुर्बल घटक | **अराखीव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | ४ | २ | - | १ | २ | १ | १ | ५ | ३ | ११ | ३० |

| **समांतर आरक्षण** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | आर्थिक दुर्बल घटक | **अराखीव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | २ | १ | - | १ | १ | १ | १ | १ | २ | ३ | १३ |
| महिला आरक्षण ३०% | १ | १ | - | - | १ | - | - | २ | १ | ३ | ९ |
| माजी सैनिक १५% | १ | - | - | - | - | - | - | १ | - | २ | ४ |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | - | - | - | - | - | - | - | १ | - | १ | २ |
| प्रकल्पग्रस्त ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| भूकंपग्रस्त २% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | ४ | २ | - | १ | २ | १ | १ | ५ | ३ | ११ | ३० |
| दिव्यांग | १ पद :- कर्णबधीर अथवा ऐकु येण्यातील दूर्बलता (Deaf/Hearing Impaired/HH) | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | वरिष्ठ लिपिक (भांडार) (गट क)<br>Senior Clerk (Stores)<br><br>एस-८ (२५५००-८११००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | ५ | ५ | विज्ञान शाखेत उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (HSC Science) परीक्षा उत्तीर्ण. | --- |

| एकूण रिक्त पदसंख्या | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | - | १ | - | - | - | - | - | १ | १ | २ | ५ |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | - | १ | १ | १ | ४ |
| महिला आरक्षण ३०% | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| माजी सैनिक १५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त २% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | - | १ | - | - | - | - | - | १ | १ | २ | ५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक, (गट क)<br>Junior Laboratory Assistant<br><br>एस-७ (२१७००-६९१००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | १८ | १८ | विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (SSC with Science) उत्तीर्ण. | --- |

| **एकूण रिक्त पदसंख्या** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | आर्थिक दुर्बल घटक | **अराखीव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | २ | २ | - | १ | १ | - | - | ३ | २ | ७ | १८ |

| **समांतर आरक्षण** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | आर्थिक दुर्बल घटक | **अराखीव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १ | - | १ | १ | - | - | २ | १ | ३ | १० |
| महिला आरक्षण ३०% | १ | १ | - | - | - | - | - | १ | १ | २ | ६ |
| माजी सैनिक १५% | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त २% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | २ | २ | - | १ | १ | - | - | ३ | २ | ७ | १८ |
| दिव्यांग | १ पद :- कर्णबधीर अथवा ऐकु येण्यातील दूर्बलता (Deaf/Hearing Impaired/HH) | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | व्यवस्थापक (उपहारगृह) (गट क) Manager (Canteen)<br><br>एस-१० (२९२००-९२३००) अधिक महागाई भत्ता व शासन नियमानुसार देय इतर भत्ते. | १ | १ | माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (SSC Pass) उत्तीर्ण आणि तदनंतर खानपान (Catering) क्षेत्रातील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. तसेच शासन मान्यताप्राप्त कोणत्याही कॅटरिंग टेक्नॉलॉजी संस्थेतून डिप्लोमा घेतलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल आणि त्याच्या बाबतीत अनुभवाची अटही शिथिल करता येईल. | --- |

| **एकूण रिक्त पदसंख्या** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | आर्थिक दुर्बल घटक | **अराखीव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विहित सामाजिक आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

| **समांतर आरक्षण** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | आर्थिक दुर्बल घटक | **अराखीव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| महिला आरक्षण ३०% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक १५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन १०% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खेळाडू ५% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त २% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

**टिप :- i. वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.**

ii. उपरोक्त नमूद केलेल्या पदांसाठी दर्शविण्यात आलेली अर्हता अर्ज स्विकारणाच्या अंतिम दिनांकास धारण करणे आवश्यक आहे.

३. **परीक्षा दिनांक :** याबाबतची सविस्तर माहिती https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच उमेदवारांच्या प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येईल.

३.१ प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून शासनाच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

३.२ जाहिरातीची माहिती https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**४. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

४.१ पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सुचनेनुसार बदल (कमी/वाढ) होण्याची शक्यता आहे.

४.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तृत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.३ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच परीक्षेचा निकाल अंतिम करपर्यंत नव्याने प्राप्त होणाऱ्या मागणीपत्रामध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल (कमी/वाढ) होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या/अतिरिक्त मागणीपत्राव्दारे प्राप्त पदे परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव, परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंसख्या कमी असल्यामुळे परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

४.४ महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.महिआ-२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.५ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.६ एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यास तसेच सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असले तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.७ समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दिनांक १३ ऑगस्ट २०१४ तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/३६-

अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.८ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ व समक्रमांकाचे शासन निर्णय दिनांक ३१ मे २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.९ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२/विजाभज-१ दिनांक २५ मार्च २०२३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार तसेच शासन शुध्दीपत्रक संबंधित जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटामध्ये (क्रिमीलेअर) मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहित धरण्यात येईल.

४.१० सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज १, दिनांक १७ ऑगस्ट २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटामध्ये मोडत नसल्याचे नॉन - क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

४.११ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.१२ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पूर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/ उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१३ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१४ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतीचा दावा करणा-या उमेदवारांकडे संबंधित कायदा/नियम/आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

४.१५ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**४.१६ खेळाडू आरक्षण :-**

४.१६.१. शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग निर्णय क्रमांक राक्रीची-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक १ जुलै २०१६ तसेच शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शुध्दीपत्रक क्रमांक राक्रोधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीपुसे-२ दिनांक १८ ऑगस्ट २०१६, शासन शुध्दीपत्रक दि.१० ऑक्टोंबर २०१७, शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग निर्णय क्रमांक राक्क्रोधो-७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२ दिनांक ३० जुन २०२२ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित

केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१६.२. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.३०.०६.२०२२ च्या शासन निर्णयानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे. खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याचाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो. या विषयाच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.१६.३. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांचे प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.१६.४. परीक्षेकरीता अर्ज सादर करतांना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-यांने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारस नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

**४.१७ दिव्यांग आरक्षण:-**

४.१७.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ दिनांक २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१७.२ गृह विभाग, शासन निर्णय क्र.एफएसएल ०४२१/प्र.क्र.४१/पोल-४, दि.०९.०६.२०२१ तसेच गृह विभाग शासन निर्णय क्र.एफएसएल ०४२१/प्र.क्र.४१(१)/पोल-४, दि.२४.०९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आस्थापनेवरील गट-अ, ब, क आणि ड मधील पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार खालील दिव्यांग प्रवर्गातील उमेदवार सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र आहे.

| अ.क्र. | पदनाम | दिव्यांग प्रकार |
|---|---|---|
| १ | वैज्ञानिक सहायक | a) D, HH<br>b) OA, OAL, CP, LC, Dw, AAV<br>c) SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above<br>e) OL |
| २ | वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र) | a) D, HH<br>b) OA, OAL, CP, LC, Dw, AAV<br>c) SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above<br>e) OL |

| | | |
|---|---|---|
| ३ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनिफित विश्लेषण) | a) D, HH<br>b) OA, OAL, CP, LC, Dw, AAV<br>c) SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above<br>e) OL |
| ४ | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक | a) D, HH<br>b) OA, OAL, CP, LC, Dw, AAV<br>c) SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above<br>e) OL |
| ५ | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक | a) D, HH<br>b) OA, OAL, CP, LC, Dw, AAV<br>c) SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) above<br>e) OL |
| ६ | वरिष्ठ लिपिक (भांडार) | a) LV<br>b) D, HH<br>c) OA, OL, BA, CP, LC, Dw, AAV<br>d) SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |
| ७ | व्यवस्थापक | a) B, LV<br>b) D, HH<br>c) OA, BA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>d) ASD (M), SLD, MI<br>e) MD involving (a) to (d) above |

**ABBREVIATIONS**

| Sr.No. | Abbreviation | Long Form | Sr.No. | Abbreviation | Long Form |
|---|---|---|---|---|---|
| 1 | B | Blind | 12 | Dw | Dwarfism |
| 2 | LV | Low Vision | 13 | AAV | Acid Attack Victim |
| 3 | D | Deaf | 14 | ASD | Autism Spectrum Disorder (M= Mind, Mod= Moderate) |
| 4 | HH | Hearing Handicapped | 15 | ID | Intellectual Disability |
| 5 | OL | One Leg | 16 | SLD | Special Learning Disability |
| 6 | OAL | One Arm and One Leg | 17 | MI | Mental illness |
| 7 | CP | Cerebral Palsy | 18 | MD | Multiple Disability |
| 8 | LC | Leprosy Cured | 19 | MDy | Muscular Dystrophy |
| 9 | OA | One Arm | 20 | BLOA | Both Legs One Arm |
| 10 | BL | Both Legs | 21 | BLA | Both Legs Arms |
| 11 | BA | Both Arms | | | |

**ABBREVIATIONS**

| Sr.No. | Abbreviation | Long Form | Sr.No. | Abbreviation | Long Form |
|---|---|---|---|---|---|
| 1 | S | Sitting | 7 | PP | Pulling & Pushing |
| 2 | ST | Standing | 8 | MF | Manipulating by Fingers |
| 3 | W | Walking | 9 | SE | Seeing |
| 4 | BN | Bending | 10 | H | Hearing |
| 5 | L | Lifting | 11 | C | Communication |
| 6 | KC | Kneeling & Crouching | 12 | RW | Reading and Writing |

४.१७.३ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४.१७.४ दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४.१७.५ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

४.१७.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार/व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी/सवलतीसाठी पात्र असतील.

४.१७.७ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन सार्वजनिक आरोग्य विभाग निर्णय क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दिनांक १४ सप्टेंबर २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**४.१७.८ दिव्यांग उमेदवार लेखनिक व अनुग्रह कालावधी :-**

- लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग-२०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ५ ऑक्टोंबर २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तीबाबतच्या लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका-२०२१ तसेच तद्नंतर शासनाचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

- प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि / अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (०७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये या कार्यालयाकडे (email-dir.fsl@maharashtra.gov.in) या ईमेलवर लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

- **लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: करावयाची आहे याची नोंद घ्यावी.**

- अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच संचालनालयाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

- परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि / अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल, तसेच लेखनिकाची मदत आणि / अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

- प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यापूर्वी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचनाचे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

- लेखनिकाचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी लेखनिकाची व्यवस्था स्वत: करावयाची असून हा लेखनिक, उमेदवार देत असलेल्या परीक्षेसाठी लागणा-या शैक्षणिक अर्हतेच्या एक अर्हता कमी असणे आवश्यक आहे.

**४.१८ अनाथ आरक्षण:-**

४.१८.१ अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन महिला व बालविकास विभाग निर्णय क्रमांक अनाथ- २०२२/प्र.क्र/१२२/का-०३ दिनांक ६ एप्रिल २०२३ व समक्रमांकाचे शासन पुरक पत्र दिनांक १० मे २०13 तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

४.१८.२ महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दिनांक ६ सप्टेंबर २०२२ तसेच दि ६ एप्रिल २०२३ अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी महिला व बाल विकास विभागाकडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य यंत्रणेकडून वितरीत करण्यात आलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

४.१८.३ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणा-या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात ०६ महिन्यांच्या कालावधीत आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांचेकडून अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी/विभाग प्रमुख यांची राहील.

४.१८.४ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

**४.१९ माजी सैनिक आरक्षण:-**

४.१९.१ गुणवत्ता यादीमध्ये येणा-या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास मूळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ दिनांक २ सप्टेंबर १९८३ नुसार

अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

ब) युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंवातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने १५% आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील, तथापि, सदर उमेदवाराने संबंधित पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

४.१९.२ उमेदवार स्वत: माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

४.१९.३ माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करणात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

४.१९.४ माजी सैनिक या समांतर आरक्षणाचा फायदा शासकीय सेवेत एकदाच अनुज्ञेय असल्यामुळे यापूर्वी सदर आरक्षणाचा लाभ घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधीत उमेदवाराची नियुक्ती अनर्ह ठरविण्यात येईल.

**४.२० प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण :-**

४.२०.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१ जानेवारी १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मूळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबावतची कार्यवाही करण्यात येईल.

४.२०.२ प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा फायदा शासकीय सेवेत एकदाच अनुज्ञेय असल्यामुळे यापूर्वी सदर आरक्षणाचा लाभ घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधीत उमेदवाराची नियुक्ती अनर्ह ठरविण्यात येईल.

**४.२१ भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण:-**

४.२१.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील, गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील भूकंपग्रस्त असल्याबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या भूकंपग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करून घेतले जाईल. सदर पडताळणीअंती होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

४.२१.२ भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा फायदा शासकीय सेवेत एकदाच अनुज्ञेय असल्यामुळे यापूर्वी सदर आरक्षणाचा लाभ घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधीत उमेदवाराची नियुक्ती अनर्ह ठरविण्यात येईल.

**४.२२ पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्याकरीता आरक्षण:-**

४.२२.१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दि.२७ ऑक्टोबर २००९ व क्रमांक अशंका-१९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ दिनांक १९ सप्टेंबर २०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ०३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मूळ प्रमाणपत्र तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.२२.२ पदवीधर अंशकालीन या समांतर आरक्षणाचा फायदा शासकीय सेवेत एकदाच अनुज्ञेय असल्यामुळे यापूर्वी सदर आरक्षणाचा लाभ घेतलेला असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर संबंधीत उमेदवाराची नियुक्ती अनर्ह ठरविण्यात येईल.

**५. पदाच्या निवडीसाठी कार्यपध्दती, आवश्यक कागदपत्रे तसेच महत्वाच्या अटी व शती (सर्व उमेदवारांसाठी):-**

५.१ संवर्ग क्र.१ ते ७ या सर्व पदांसाठी अर्ज केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्यांचेकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

५.२ संवर्ग क्र.१ ते ७ या सर्व पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी शासन महसूल व वन विभाग निर्णय रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दिनांक २७ जुन २०११ नुसार ज्या उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म हा महाराष्ट्र राज्यात झाल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. ज्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला नसेल परंतू महाराष्ट्र राज्यातील रहिवास सलग १५ वर्ष व त्यापेक्षा अधिक कालावधीचा आहे अशा उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

५.३ उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

५.४ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना ज्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र Cast Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवडीअंती सादर करणे आवश्यक आहे.

५.५ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बोसीसी- २०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ मधील तरतूदीनुसार, याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५.८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

५.६ उमेदवारांना परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. परिक्षेसाठी नेमून दिलेल्या परिक्षा केंद्रावर दिलेल्या वेळेपूर्वी १ तास ३० मिनिटे (९० मिनिटे) अगोदर उपस्थित रहावे.

५.७ नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ नुसार लागू करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागू राहील. त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना लागू राहणार नाही, तथापि, सदर नियमात भविष्यात काही बदल झाल्यास त्याप्रमाणे योजना लागू राहील.

५.८ अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राचे आधारे कागदपत्रे तपासणीवेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासण्याच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांना बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधीत उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल.

**६. पात्रता:-**

६.१ भारतीय नागरिकत्व.

६.२ वयोमर्यादा :-

जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांसाठी अर्ज सादर करणा-या उमेदवाराचे वय दि.२७.०२.२०२४ रोजी गणले जाईल.

| अ.क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा | |
|---|---|---|---|
| | | किमान | कमाल |
| १ | अमागास | १८ | ३८ |
| २ | मागासवर्गीय/अनाथ/आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | १८ | ४३ |
| ३ | प्राविण्यप्राप्त खेळाडू | १८ | ४३ |
| ४ | माजी सैनिक | | |
| | अमागास | १८ | ३८+सैनिकी सेवेचा कालावधी+३ |
| | मागासवर्गीय/अनाथ/आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | १८ | ४३+सैनिकी सेवेचा कालावधी+३ |
| ५ | दिव्यांग | १८ | ४५ |
| ६ | प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त | १८ | ४५ |
| ७ | पदवीधर अंशकालीन | १८ | ५५ |

**७. परीक्षेचे स्वरुप :-**

७.१

| अ. क्र. | संवर्ग | परीक्षेसाठी गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा एकूण प्रश्न | व्यावसायिक चाचणी | एकूण गुण |
| १ | वैज्ञानिक सहायक, गट-क | १०० | - | २०० |
| २ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण) गट-क | १०० | - | २०० |
| ३ | वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र), गट-क | १०० | | २०० |
| ४ | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक, गट-क | १०० | - | २०० |
| ५ | वरिष्ठ लिपिक (भांडार), गट-क | १०० | - | २०० |
| ६ | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक, गट-क | १०० | - | २०० |
| ७ | व्यवस्थापक, गट-क | १०० | - | २०० |

सा.प्र.विभाग, शा.नि. क्र.प्रानिमं-१२१२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.०४.०५.२०२२ नुसार परीक्षेचा अभ्यासक्रम निश्चित करणे आवश्यक असल्याने त्यामध्ये मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दिक चाचणी याप्रमाणे परीक्षेचे विषय निश्चित करण्यात आले आहे. परंतु, संचालनालयातील वैज्ञानिक सहायक, वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण) वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र) व वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक पदांच्या तांत्रिक बाबीं, शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदा-या

लक्षात घेऊन विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र/ भौतिकशास्त्र/संगणक शास्त्र/इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान/ मानसशास्त्र/ न्यायसहायक विज्ञान तसेच अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र/ इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान या विषयाचा समावेश करणे अत्यावश्यक असून परिक्षेचा अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचा दर्जा, स्वरूप, प्रश्नसंख्या व त्यासाठी विहित केलेले गुण व कालावधी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | संवर्ग | परिक्षेचा अभ्यासक्रम<br>**घटक व उपघटक आणि प्रश्नपत्रिकेचा दर्जा** | प्रश्नसंख्या | एकूण विहित केलेले गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैज्ञानिक सहायक, गट-क | १) मराठी :- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammer,Use of Simple Dialects and Regular words)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | २) इंग्रजी :- स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammar, Spelling, Use of Simple Dialects and Regular words)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | ३) सामान्य ज्ञान :- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण, शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न. (Daily Incidents, Literature, Religion, Politics, Ethology, Social and Industrial Amendments, Greats personalities of sports and their achievements, History and Geographical outlines of Maharashtra)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | ४) बौध्दिक चाचणी विषयक प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रश्न विचारण्यात येतील. Situational and conditional Questions<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | ५) विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र व न्यायसहायक विज्ञान संबंधित पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार प्रश्न विचारण्यात येतील.<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. | ४० | ८० | |
| | | **एकूण** | १०० | २०० | ९० मिनिटे |

| अ. क्र. | संवर्ग | परिक्षेचा अभ्यासक्रम<br>**घटक व उपघटक आणि प्रश्नपत्रिकेचा दर्जा** | **प्रश्नसंख्या** | **एकूण विहित केलेले गुण** | **कालावधी** |
|---|---|---|---|---|---|
| २ | वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण), गट-क | १) मराठी :- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammer,Use of Simple Dialects and Regular words)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | २) इंग्रजी :- स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammar, Spelling, Use of Simple Dialects and Regular words)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | ३) सामान्य ज्ञान :- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण,शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न. (Daily Incidents, Literature, Religion, Politics, Ethology, Social and Industrial Amendments, Greats personalities of sports and their achievements, History and Geographical outlines of Maharashtra)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | **४)** बौध्दिक चाचणी विषयक प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रश्न विचारण्यात येतील. Situational and conditional Questions<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | **५)** विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र/संगणक शास्त्र/इलेक्ट्रॉनिक्स/ माहिती तंत्रज्ञान/न्यायसहायक विज्ञान तसेच अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र/ इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान आणि Post Graduate Diploma in Digital and Cyber Forensic and Related Law संबंधित पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार प्रश्न विचारण्यात येतील.<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. | ४० | ८० | |
| | | **एकूण** | १०० | **२००** | **९० मिनिटे** |

| अ. क्र. | संवर्ग | परिक्षेचा अभ्यासक्रम<br>**घटक व उपघटक आणि प्रश्नपत्रिकेचा दर्जा** | प्रश्नसंख्या | एकूण विहित केलेले गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ३ | वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र) गट-क | १) मराठी :- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammer, Use of Simple Dialects and Regular words)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | २) इंग्रजी :- स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammar, Spelling, Use of Simple Dialects and Regular words)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | ३) सामान्य ज्ञान:- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण,शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न.<br>(Daily Incidents, Literature, Religion, Politics, Ethology, Social and Industrial Amendments, Greats personalities of sports and their achievements, History and Geographical outlines of Maharashtra)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | **४)** बौध्दिक चाचणी विषयक प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रश्न विचारण्यात येतील. Situational and conditional Questions<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | **५) मानसशास्त्र विषयातील पदवी याप्रमाणे** संबंधित पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार प्रश्न विचारण्यात येतील.<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. | ४० | ८० | |
| | | **एकूण** | **१००** | **२००** | **९० मिनिटे** |

| अ. क्र. | संवर्ग | परिक्षेचा अभ्यासक्रम<br>**घटक व उपघटक आणि प्रश्नपत्रिकेचा दर्जा** | प्रश्नसंख्या | एकूण विहित केलेले गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ४<br><br>५ | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक गट-क<br><br>वरिष्ठ लिपिक (भांडार) गट-क | १) मराठी:- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammer, Use of Simple Dialects and Regular words) प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | २) इंग्रजी:- स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammar, Spelling, Use of Simple Dialects and Regular words)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | ३) सामान्य ज्ञान:- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण,शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न.<br>(Daily Incidents, Literature, Religion, Politics, Ethology, Social and Industrial Amendments, Greats personalities of sports and their achievements, History and Geographical outlines of Maharashtra)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | **४)** बौध्दिक चाचणी विषयक प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रश्न विचारण्यात येतील. Situational and conditional Questions.<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | **५)** विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार प्रश्न विचारण्यात येतील.<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) दर्जाच्या समान राहील. | ४० | ८० | |
| | | **एकूण** | १०० | २०० | ९० मिनिटे |

| अ. क्र. | संवर्ग | परिक्षेचा अभ्यासक्रम<br>**घटक व उपघटक आणि प्रश्नपत्रिकेचा दर्जा** | **प्रश्नसंख्या** | **एकूण विहित केलेले गुण** | **कालावधी** |
|---|---|---|---|---|---|
| ६ | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक, गट-क | १) मराठी:- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर<br>(Grammer, Use of Simple Dialects and Regular words)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | २) इंग्रजी:- स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर<br>(Grammar, Spelling, Use of Simple Dialects and Regular words )<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | ३) सामान्य ज्ञान:- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण,शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न.<br>( Daily Incidents, Literature, Religion, Politics, Ethology, Social and Industrial Amendments, Greats personalities of sports and their achievements, History and Geographical outlines of Maharashtra)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | ४) बौध्दिक चाचणी विषयक प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रश्न विचारण्यात येतील. Situational and conditional Questions.<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी ) दर्जाच्या समान राहील. | १५ | ३० | |
| | | ५) ) विज्ञान शाखेतील माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार प्रश्न विचारण्यात येतील.<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी ) दर्जाच्या समान राहील. | ४० | ८० | |
| | | **एकूण** | **१००** | **२००** | **९० मिनिटे** |

| अ. क्र. | संवर्ग | परिक्षेचा अभ्यासक्रम<br>**घटक व उपघटक आणि प्रश्नपत्रिकेचा दर्जा** | प्रश्नसंख्या | एकूण विहित केलेले गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ७ | व्यवस्थापक, गट-क | १) मराठी:- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammer, Use of Simple Dialects and Regular words)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी ) दर्जाच्या समान राहील. | २५ | ५० | |
| | | २) इंग्रजी:- स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर (Grammar, Spelling, Use of Simple Dialects and Regular words )<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी ) दर्जाच्या समान राहील. | २५ | ५० | |
| | | ३) सामान्य ज्ञान:- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण,शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न.<br>(Daily Incidents, Literature, Religion, Politics, Ethology, Social and Industrial Amendments, Greats personalities of sports and their achievements, History and Geographical outlines of Maharashtra)<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी ) दर्जाच्या समान राहील. | २५ | ५० | |
| | | ४) बौध्दिक चाचणी विषयक प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रश्न विचारण्यात येतील. Situational and conditional Questions.<br>प्रश्नपत्रिकेचा दर्जा - माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी ) दर्जाच्या समान राहील. | २५ | ५० | |
| | | **एकूण** | १०० | २०० | **९० मिनिटे** |

७.२ परीक्षा ही ऑनलाईन (Computer Based Test) पध्दतीने घेण्यात येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक ०२ गुण ठेवण्यात येतील.

७.३ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दिनांक ४ मे २०२२ मधील तरतूदीनुसार संवर्ग क्र.१ ते ७ या सर्व पदांकरीता मौखिक (मुलाखती) परीक्षा घेण्यात येणार नाहीत.

७.४ उमेदवारांची निवडसूची तयार करणेसाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ दिनांक १६ मार्च १९९९ आणि सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक

संकीर्ण-१११९/प्र.क्र.३९/१६-अ दिनांक १९ डिसेंबर २०१८ तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दिनांक ४ मे २०२२ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

७.५ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दिनांक ४ मे २०२२ मधील तरतुदीनुसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

७.६ परीक्षेचा निकाल (निवडसूची) तयार करतांना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा प्राधान्यक्रम हा महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दिनांक ४ मे २०२२ मध्ये नमूद निकषांच्या आधारे क्रमवार लावला जाईल.

७.७ प्रश्नपत्रिकेतील प्रश्नाबाबत उमेदवारास काही हरकत असल्यास प्रति प्रश्न रुपये १००/- इतके शुल्क आकारले जाईल. तसेच परीक्षेच्या समाप्ती दिनांकापासून सात (०७) दिवसाच्या आत प्राप्त असलेल्या हरकती विचारात घेण्यात येईल,

- परीक्षा ही ऑनलाईन (Computer Based Test) पध्दतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. सत्र १ ते अंतिम सत्र यामधील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व त्याची काठिण्यता तपासण्यात येऊन त्याचे समानीकरण करणेचे (Normalization) पध्दतीने गुणांक निश्चित करुन निकाल जाहीर करणेत येईल. Normalization साठीचे सूत्र संकेतस्थळावर माहितीसाठी प्रकाशित केलेले आहे. सदर (Normalization) सर्व परिक्षार्थी यांना बंधनकारक राहील, याची सर्व परिक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

**८. विहित कागदपत्रे/ प्रमाणपत्रे संलग्न (Upload) करणे :-**

८.१ प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने परीक्षेकरीता अर्ज सादर करताना खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्पग्रस्त, भुंकपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे PDF फाईल फॉरमॅट मध्ये संलग्न (Upload) करावीत.

८.२ विविध सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (After Checking the Eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील (लागू असलेली) कागदपत्रे/प्रमाणपत्रे संलग्न अपलोड (Upload) करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र |
|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता). |
| २ | वयाचा पुरावा. |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादींचा पुरावा. |
| ४ | सामाजिदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा. |
| ५ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असल्याबाबतचा पुरावा. |
| ६ | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र. |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा. |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा. |
| ९ | खेळाडू आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. |
| ११ | प्रकल्पग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. |
| १२ | भूकंपग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. |
| १३ | अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा . |
| १४ | एस.एस.सी.नावात बदल झाल्याचा पुरावा. |

| | |
|---|---|
| १५ | अराखीव महिला, मागासवर्गीय, आ.दु.घ. व खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र. |
| १६ | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र. |
| १७ | अनुभव प्रमाणपत्र. |
| १८ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |

८.३ उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील उपलब्ध लिंकवर उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मध्ये प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे. खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे संलग्न (Upload) केल्याशिवाय अर्ज स्विकृत केला जाणार नाही.

**९. सर्वसाधारण सूचना :-**

एक) अर्ज फक्त ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्विकारण्यात येतील.

दोन) अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://dfsl.maharashtra.gov.in

तीन) अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://dfsl.maharashtra.gov.in व www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

चार) अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

पाच) अर्ज भरण्याची व परीक्षाशुल्क भरण्याची अंतिम तारीख संगणकामार्फत निश्चित केली असल्याने पेमेंट गेटवे दिलेल्या तारखेला व वेळेला बंद होणार आहे. त्यामुळे परिक्षार्थी उमेदवारांनी मुदतीतच अर्ज व परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

**९.१ केंद्र निवड :-**

९.१.१ अर्ज सादर करताना परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. उपलब्ध पर्यायापैकी पसंतीक्रमानुसार तीन केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

९.१.२ केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

९.१.३ केंद्र निवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवास पत्याचे आधारे संबंधित महसूली मुख्यालयाच्या जिल्हा केंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेशपत्र देण्यात येईल. याबाबत शासनाचे त्या त्या वेळेचे धोरण व निर्णय अंतिम राहील.

**९.२ परीक्षा शुल्क (फी) व परीक्षा शुल्काचा भरणा करणे :-**

९.२.१ खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारासाठी रु.१०००/-

९.२.२ मागासवर्गीय/आ.दु.घटक/अनाथ/दिव्यांग प्रवर्गाच्या उमेदवारासाठी रु.९००/-

९.२.३ माजी सैनिक / दिव्यांग माजी सैनिकांना परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

९.२.४ उपरोक्त परीक्षा शुल्का व्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

९.२.५ परीक्षा शुल्क ना परतावा (Non-Refundable) आहे.

९.२.६ उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

९.२.७ परीक्षा शुल्काचा भरणा खालील पध्दतीने करता येईल.

**ऑनलाईन पध्दतीने :-**

- परीक्षा शुल्काचा भरणा प्रणालीद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

- परीक्षा शुल्क अदा करताना बँक खात्यातून परीक्षा शुल्काची रक्कमेची वजावट झाल्यानंतर परीक्षा शूल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश- ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरुन आणि / अथवा खात्यातून लॉग आऊट होऊ नये.

- परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्क भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे ? याची स्थिती (Status) लगेच अवगत होईल. खात्यातून लॉग आऊट (Log Out) होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

- परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहित दिनांक/विहित वेळेपुर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. विहीत मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकणा-या उमेदवारांचा संबंधित भरती प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

**९.२.८ अर्ज सादर करण्याची प्रक्रिया / कालावधी :-**

| अ.क्र. | तपशिल | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दि.०६.०२.२०२४ ते दि.२७.०२.२०२४ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि.०६.०२.२०२४ ते दि.२८.०२.२०२४ |
| ३ | परिक्षेचा दिनांक व अंतिम कालावधी | https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच उमेदवारांच्या प्रवेशपत्राव्दारे कळविण्यात येईल. |

**१० निवडसूचीची कालमर्यादा :-**

१०.१ राज्यस्तरीय निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या

दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. तद्नंतर ही निवडसूची व्यपगत होईल. भरती प्रक्रियेदरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया, निवडसूची, प्रतिक्षासूची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सूचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

१०.२ राज्यस्तरीय निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजु न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार, किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रूजु झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याच्या मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या-त्या प्रवर्गाच्या निवडसूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून (प्रतिक्षा यादीतील) निवडसूचीच्या कालमर्यादेत वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. तथापि, भरती प्रक्रियेदरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया, निवडसूची, प्रतिक्षासूची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सूचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

११. **सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता परीक्षा विहित वेळेत व विहित संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

११.१ जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा.

११.२ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसेल तर ती परीक्षा.

११.३ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र परीक्षा.

**१२. प्रवेश प्रमाणपत्र :-**

१२.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर https://dfsl.maharashtra.gov.in उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे १० दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२.२ परोक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वतःचे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२.३ प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या अर्जात नमूद नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक आठवडा अगोदर प्रसिध्द करण्यात येईल.

१२.४ परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह या कार्यालयाकडे (email-dir.fsl@maharashtra.gov.in) या ईमेलवर संपर्क साधावा.

१२.५ परीक्षेच्या स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स, यापैकी किमान कोणतेही एक मुळ ओळखपत्र तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१२.६ आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवारांचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Adhar Generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यास तसेच सुस्पष्ट फोटोसह रंगीत प्रिंटमध्ये आधार डाऊनलोड केले असल्यास ई-आधार वैध मानण्यात येईल.

१२.७ नावामध्ये बदल केलेला असल्यास, विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रिया यांच्या बाबतीत) नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१३. परीक्षेस प्रवेश :-**

संबंधित परीक्षेच्या प्रवेशप्रमाणपत्रावर नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेच्या उपस्थितीसाठी पात्र समजण्यात येईल. तथापि, परीक्षा सुरू होण्यापूर्वी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर दिलेल्या वेळेपूर्वी १.३० तास अगोदर ओळख तपासणीची पूर्तता करण्यासाठी उपस्थित रहावे लागेल,

**१४.** कोणत्याही परिस्थितीमध्ये परीक्षा सुरु झाल्यानंतर उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही, अशा उमेदवारांना पुर्नपरीक्षा देण्याची कोणतीही व्यवस्था केली जाणार नाही.

**१५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्विकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा पध्दती, अभ्यासक्रम इत्यादीबाबतचा सविस्तर तपशीलासाठी शासनाचे https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील उमेदवारांकरीता माहिती विभागातील सूचना-अंतर्गत सर्वसाधारण सूचना-तसेच परीक्षा या सदराखाली उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.

**१६.** शासनाचे https://dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल,

**१७.** सदर जाहिरात शासनाच्या https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१८. इतर महत्वाच्या सूचना :-**

१८.१ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

१८.२ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारची शिफारस किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरवली जाईल.

१८.३ भरतीप्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अशंतः बदल करणे तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेणे, पडताळणीअंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादीस मान्यता देणे, जाहिरातीच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई/राज्यस्तरीय समन्वय समिती यांना राहतील.

१८.४ उमेदवारांना परीक्षेकरीता, कागदपत्रे पडताळणीकरीता कोणत्याही प्रकारचा भत्ता व प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

१८.५ भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवार कोणत्याही कारणास्तव गैरहजर असेल तर असे उमेदवार भरती प्रक्रियेतून बाद ठरतील व परीक्षा शुल्क ना-परतावा राहील.

१८.६ मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे, कागदपत्र पडताळणीच्या दिनांकाच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

१८.७ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरताना दिलेले भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईक क्रमांक) व ई-मेल आयडी कृपया भरती प्रक्रिया संपेपर्यंत बदलू नयेत.

१८.८ ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातीचे काळजीपूर्वक वाचन करावे, जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी.

१८.९ चुकीची / खोटी प्रमाणपत्र सादर करणारा उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१८.१० शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांना ऑनलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांच्या कार्यालय प्रमुखाच्या परवानगीने विहीत मार्गाने व विहीत मुदतीत भरणे आवश्यक राहील व ना हरकत प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणी वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

**१९. विशेष सुचना :-**

१९.१ कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

१९.२ प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

१९.३ सदर भरतीप्रक्रिया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार संचालनालयास असतील.

१९.४ ऑनलाईन अर्ज भरत असताना काही अडचणी आल्यास त्यासंदर्भात उमेदवारांच्या Login ID वरील Grievance Desk यावर संबंधीत माहिती उपलब्ध करुन घेता येईल आणि Registration Page वरील नमूद क्रमांकावर संपर्क साधू शकता.

१९.५ सदरची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील रोजगार शिर्षाखाली आणि संचालनालयाच्या dfsl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**

संचालक तथा सदस्य सचिव, निवड समिती

न्या.वै.प्र.शाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**स्थळ :- मुंबई.**

**दिनांक :- ०५.०२.२०२४**




To get the latest jobs alert on your mobile

Please Join our WhatsApp group